# व्याख्यान -०१

# बहिःशाल व्याख्यान संक्षिप्त अहवाल

## दिनांक : १३/०१/२०१८

## स्थळ : किकी ता.जि.नांदेड.

जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालयाच्या बहिःशाल शिक्षण केंद्राच्या वतीने दिनांक १३/०१/२०१८ रोजी मौजे किकी.ता.जि.नांदेड. येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते म्हणुन गोपाळराव पाटील ईजळीकर हे होते. व्याख्यानाचा विषय शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे उपाय व शासनाचे धोरण हा होता.

व्याख्यानात त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर अभ्यासपुर्ण मांडली केली.नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतीमालाला मिळणारे कमी बाजार भाव , शासनाचे शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी शेती पासुन दुरावत चालला आहे.त्याचा परिणाम राष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेवर व सामाजिक स्थीतीवर होत आहे.सेंद्रीय शेती, शेतीला व्यापारी दृष्टीकोनतुन पाहणे , शासनाचे धोरण. कृषीसाठी अनुकुल असावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.मेघराज कपुर हे होते.प्रास्ताविक महाविद्यालयाच्या बहिःशाल शिक्षण केंद्र विभागाचे प्रा.डॉ.नरहरी पाटील यांनी केले. तर आभार डॉ.ए.ए.शेख यांनी मानले. कार्यक्रमाला किकीचे सरपंच भरत देशमुख , ग्रामस्थ ,प्रा.शिवाजी शिंदे व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गिताने झाली.

Principal
Jawaharlal Nehru College of
Social Work New Nanded

## व्याख्यान -०२

# बहि:शाल व्याख्यान संक्षिप्त अहवाल

## दिनांक : १४/०१/२०१८

### स्थळ : वडगाव ता.लोहा जि.नांदेड.

जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालयाच्या बहि:शाल शिक्षण केंद्राच्या वतीने दिनांक १४/०१/२०१८ रोजी मौजे वडगाव ता.लोहा जि.नांदेड. येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते म्हणुन प्रा.संतोष देवराये हे होते. व्याख्यानाचा विषय सामाजिक विकासात समाजसुधारकांचे योगदान हा होता.

व्याख्यानात प्रा.संतोष देवराये यांनी सावित्रिबाई फुले , छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव केला. सामाजिक विकास घडवुन आणण्यासाठी युवकांनी या थोर समाजसुधारकांच्या विचारांचा , कार्यांचा अंगीकार जिवनात करुन स्वत:चा व समाजाचा विकास घडवुन आणावा असे आवाहन केले.व्यक्तीमहत्व विकासात पुस्तके,ग्रंथ, यांचे महत्वाचे योगदान असल्यामुळे तरुणांनी चांगल्या विचारांच्या पुस्तकांचा अभ्यास करुन प्रगती साधावी असे मत मांडले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या सांस्कृतीक विभाग प्रमुख प्रा.डॉ.निरंजनकौर सरदार हया कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.वडगावचे सरपंच श्री प्रल्हादराव कल्याणकर, उपसरपंच, ग्रामस्थ, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक डॉ.एन.जि.पाटील यांनी केले. तर आभार प्रा.सुनिल गोईनवाड यांनी मांडले. कार्यक्रमाला प्रा.डॉ.ए.ए.शेख, प्रा.डॉ.अंबादास कर्डिले, श्री बळीराम गुंडे,उपस्थित होते.

Principal
Jawaharlal Nehru College of
Social Work New Nanded




श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे,
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,
(B.S.W. / M.S.W.) नविन नांदेड.
बहि:शाल शिक्षण व्याख्यानमाला
( External Education Center SRTM University, Nanded.)